CMYK

दैनिक

बीड । मंगळवार
७.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २७१
किंमत : ३ रू. पाने : ४

मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 पान –१

दादांचा धनंजय मुंडेंना वादा!

धनुभाऊंच्या राजीनाम्यावर अजित पवारांची भूमिका ठरली

मुंबई, (वृत्तसेवा):– आवादा कंपनीच्या दोन कोटींच्या खंडणी प्रकरणात वाल्मिक कराड मुख्य आरोपी असल्याने तसेच खंडणीचा संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबंध असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागलेली आहे. मात्र जोपर्यंत धनंजय मुंडे यांच्यावरील आरोप सिद्ध होत नाहीत तोपर्यंत राजीनामा घेणार नसल्याचे अजित पवार यांनी सांगितल्याचे कळते. धनंजय मुंडे यांच्यावर आरोपांची राळ उठलेली ▶▶पान २ वर

जोपर्यंत दोषी सिद्ध होत नाही तोपर्यंत राजीनामा नाही

विरोधी पक्षातून तसेच सत्ताधारी पक्षातून धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागितला जात आहे. परंतु दोषी सिद्ध होत नाही तोपर्यंत धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणे योग्य नाही, असे अजित पवार यांनी सांगितले. खंडणी आणि खून प्रकरणात विविध आरोप होत आहे. राज्य सरकारने एसआयटी गठीत केली आहे. विशेष तपास समिती तपास करीत आहे. मात्र तपास सुरू असताना केवळ आरोप होत ▶▶पान २ वर

सरपंच हत्या प्रकरण 'राजभवनात'

मंत्री मुंडेंच्या राजीनाम्यासाठी शिष्टमंडळाने घेतली राज्यपालांची भेट

बीड, (प्रतिनिधी):–संतोष देशमुख हत्या प्रकरणी थेट मुंबईचे राजभवन गाठून आज शिष्टमंडळाने राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्ण यांची भेट घेऊन या घटनेचा तपास होईपर्यंत मंत्री धनंजय मुंडे यांचा मंत्रिपदाचा राजीनामा घ्यावा अशी मागणी करण्यात आली. यावेळी खा. छत्रपती संभाजीराजे, बजरंग सोनवणे, विरोधी पक्षनेते दाणवे, आ. धस, क्षीरसागर, आव्हाड, मेटे यांच्यासह आदिंची उपस्थिती होते. ही रसत्यावरची लढाई आता राजभवनात पोहोचली आहे. केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष

देशमुख यांच्या हत्येच्या घटनेने राज्य ढवळून निघाले 'असून, याप्रकरणी रस्त्यावरची लढाई लढण्यात येत असून, बीड, रेणापूर (लातूर), परभणी, पुणे असे विविध ठिकाणी मोर्चे निघाले आहेत. ही हत्या पवनचक्की खंडणी प्रकरणातून झाली असून, याप्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांचा उजवा हात समजला जाणारा वाल्मिक कराड आरोपी असल्याने हत्या प्रकरणात तो सह आरोपी करावा म्हणून मागणी होत आहे. तर यामुळे धनंजय मुंडे ही अडचणीत आले असून, त्यांच्याही मंत्रीपदाचा राजीनामा मागण्यात येत आहे. संतोष देशमुख यांना न्याय मागणीसाठी निघालेल्या मोर्चात सर्वांचा हाच रोख दिसून आला आहे. यावर धनंजय मुंडे यांनी स्पष्टीकरण दिले असलेतरी ही मागणी दिवसेंदिवस वाढतच असल्याचे दिसून येत आहे. शासनाने या हत्येच्या तपासासाठी एसआयटी, सीआयडी नेमली तरी निष्पक्ष तपासासाठी ▶▶पान २ वर

गुंडापासून लोकप्रतिनिधींच्या जिवाला धोका

मुंबई (वृत्तसेवा) :– बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी महिना लोटला तरीही पोलिसांकडून ठोस कारवाई झालेली नाही. एक आरोपी अद्याप फरार असून अटकेत असलेल्या आरोपींची सीआयडी चौकशी सुरू आहे. या प्रकरणी

शरद पवारांचे मुख्यमंत्री फडणविसांना पत्र

बीडमध्ये भव्य मोर्चे निघाले असून आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी जोर धरतेय. दरम्यान, या प्रकरणात आता राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शरद पवार यांनीही भूमिका मांडली आहे. गुंडांपासून लोकप्रतिनिधींच्या जीवाला धोका निर्माण झाला असून राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी गांभीर्याने लक्ष घालावे, असं शरद पवार म्हणालेत. तसंच, लोकप्रतिनिधींच्या व इतर नेत्यांच्या सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेत त्यांना शासनामार्फत योग्य ते ▶▶पान २ वर

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेसाठी

खा.बजरंग सोनवणेंनी घेतली पोलीस महासंचालकांची भेट

बीड,(प्रतिनिधी):–मागील काही वर्षात बीड जिल्ह्यात गुंडगिरी वाढलेली असून यास राजकिय नेत्यांचा वरदहस्त आहे. यामुळे जिल्ह्यात अनेक अवैध धंदे चालत असून याच अवैध धंद्यातून पैसा येतो, तथापी, याच पैशातून गुंडाराज फोफावत असून जिल्ह्यातील गुंडाराजचा खात्मा करावा, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी राज्याचे पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) संजय सक्सेना यांची भेट घेवून केली. यावेळी सक्सेना यांनी कोणाचीही हयगय केली जाणार नाही, असे म्हटले. ▶▶पान २ वर

योजना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी गावागावांमध्ये कॅम्प घेऊन मार्गदर्शन करा

आ.संदीप क्षीरसागरांकडून तहसिलदार, गटविकास अधिकारी,कृषी अधिकाऱ्यांना निर्देश

बीड,(प्रतिनिधी):– ग्रामीण भागातील शेतकरी, सामान्य नागरिक व दुर्बल घटक यांच्याकरिता विविध योजना राबविण्यात येतात. परंतु या योजना परिपूर्ण रीतीने पोहचल्या पाहिजेत याकरिता प्रशासनाने बीड मतदारसंघात समिती स्थापन करून, गावोगावी जाऊन त्याठिकाणी कॅम्प घेऊन लाभार्थींना मार्गदर्शन करावे. असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी तहसिलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी यांना दिले आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक, विविध दुर्बल घटक तसेच समाजातील सर्वच घटकांसाठी शासनस्तरावरून विविध योजना अंमलात आणल्या जातात. योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी शासनस्तरावर सतत प्रक्रिया सुरू असते. लोकप्रतिनिधी म्हणून आम्हीदेखील याविषयी पाठपुरावा करत असतो. मात्र या योजना अधिकाधिक गरजूंपर्यंत पोहचवण्यासाठी स्थानिक प्रशासनाकडून प्रभावी आणि नवनवीन पध्दतीने लाभार्थ्यांपर्यंत जाणे गरजेचे आहे. त्यामुळे योजनांची अंमलबजावणी ▶▶पान २ वर

धनंजय मुंडेसाठी राष्ट्रवादी आक्रमक

सुरेश धसांवर गंभीर आरोप

बीड, (प्रतिनिधी):– संतोष देशमुख हत्या प्रकरणावरुन आ. सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आरोपांच्या फैरी झाडल्या नंतर आता राष्ट्रवादी कॉंग्रेस देखील आक्रमक झाली आहे. राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अविनाश नाईकवाडे यांनी पत्रकार परिषदेतून आ. सुरेश धस यांच्यावर गंभीर आरोप केले असून सुरेश धसांनी या आरोपांची उत्तरे ▶▶पान २ वर

धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराडमुळेच पंकजा मुंडेंचा पराभव-आ.सुरेश धस

मुंबई, (वृत्तसेवा) :– धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्या वागण्यामुळेच पंकजा मुंडे यांचा लोकसभेत पराभव झाला, मात्र त्यासाठी आम्हाला जबाबदार ठरवण्यात आलं असा आरोप भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केला. वाल्मिक कराडमुळेच बजरंग सोनवणे हे धनंजय मुंडे यांना सोडून गेले. समोर तगडा उमेदवार उभा राहिल्यानेच पंकजा पराभूत झाल्या असंही सुरेश धस म्हणाले. टीव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीला मुलाखत देताना सुरेश धस यांनी हे वक्तव्य केलं. पंकजा मुंडे यांचा पराभव हा धनंजय मुंडे आणि

वाल्मिक कराडच्या दहशतीमुळे, त्यांच्या वागण्यामुळे झाला असा आरोप यावेळी सुरेश धस यांनी केला. धनंजय मुंडे यांची परळीत दहशत नाही, पण वाल्मिक कराडची आहे. धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराडमुळे अनेकजण पंकजा मुंडेंवर नाराज झाले. त्याचा परिणाम हा लोकसभेच्या निवडणुकीत झाला. पंकजा मुंडे यांना माझ्या मतदारसंघातून ३१ हजारांचे लीड मिळाले. परळीमधून ७३ हजारांचे लीड मिळाले. पण एकट्या बीड तालुक्यातून त्या ९८ हजारांनी मागे पडल्या असं सुरेश धस म्हणाले. पंकजा मुंडेंना हे सर्व माहिती आहे. पण त्या थेट बोलू शकत नाही. म्हणून मी हे बोलतोय असंही सुरेश धस म्हणाले. ▶▶पान २ वर

'बीडमध्ये संविधान बचाव' जनआक्रोश मोर्चा

बीड, (प्रतिनिधी) :– परभणी येथील शहीद भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांचा संशयास्पद मृत्यू असून दोषींविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी यासह इतर मागण्यांसाठी आज बीड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी रस्त्यावर उतरले. डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून संविधान बचाओ जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर दुपारी धडकला. या मोर्चात हजारो आंबेडकर अनुयायी सहभागी झाले होते. परभणी येथे जाणीवपूर्वक संविधान प्रतिमेची केलेली विटंबना यासह शहीद भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांचा झालेला संशयास्पद मृत्यू तसेच देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी केलेले गैरवक्तव्ये केज तालुक्यातील मस्साजोग येथील

संतोष देशमुख यांची झालेली निर्घृण हत्या या सर्व घटनांचा जाहीर निषेध करण्यासाठी सोमवारी बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर संविधान बचाओ जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून निघाला होता. मोर्चामध्ये हजारो अनुयायांची उपस्थिती होती.

मातोश्री ग्राम समृद्धी योजनेंतर्गत रखडलेले शेत पाणंद रस्ते पावसाळ्यापूर्वी पुर्ण करण्यात यावेत

जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना निवेदन–डॉ.गणेश ढवळे

बीड,(प्रतिनिधी):–ग्रामीण भागात शेतवस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने मातोश्री ग्राम समृद्धी शेत/ पाणंद रस्ते योजना अस्तित्वात आणली मात्र शासकीय नियमांच्या कचाट्यात योजना सापडली असुन प्रसिद्धी माध्यमांद्वारे गाजावाजा करण्यात आलेल्या योजनेचे वास्तव क्लेशदायक असुन बीड जिल्ह्यातील मातोश्री ग्राम समृद्धी शेत/ पाणंद रस्ते योजनेंतर्गत शासनाने मंजुरी दिलेल्या २०७४ कामांपैकी केवळ ४४८ कामे ▶▶पान २ वर

नाट्यगृहे मराठी चित्रपटाला तारतील?

मल्टीप्लेक्समध्ये पडदा न मिळणे, तिथे मराठी चित्रपट प्रदर्शित झालाच तरी 'प्राइम टाइम'मध्ये खेळासाठी वेळ न मिळणे, दोन-चार दिवसानंतर खेळ सुरू राहण्यासाठी करावी लागणार धडपड आणि आता 'ओटीटी'ची क्रांती या सर्वांमुळे मराठी चित्रपटाची अभूतपूर्व कोंडी झाली आहे. चित्रपट लोकांपर्यंत पोहोचवण्याची हक्काची जागा नसल्याने दर्जेदार आणि आशयघन मराठी चित्रपटांच्या निर्मितीचे प्रमाण रोडावले आहे. या अडचणींवर मात करून चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याची जागा ही नाट्यगृहांची नवी ओळख होऊ शकते. पांढरा हत्ती ठरलेल्या नाट्यगृहांमध्ये मोठ्या प्रमाणात मराठी चित्रपट झळकू लागले, तर मराठी चित्रपटसृष्टीचे अर्थकारण बदलू शकते. या निमित्ताने मराठी चित्रपट प्रदर्शनाची नवी वाट खुली होण्याची शक्यता आहे. करोना काळानंतर मनोरंजनाची व्याख्या पूर्ण बदलून गेली आहे. झपाट्याने बदलणाऱ्या डिजिटल तंत्रज्ञानामुळे आणि लक्ष विचलित करण्यासाठी अनेक प्रकारचे पर्याय समोर असल्याने कोणत्याही एका गोष्टीवर लोकांना स्थिर ठेवणे मोठे आव्हान आहे. लोकांचा एका गोष्टीवर स्थिरचित्त राहण्याचा कालावधी अर्थात 'अटेन्शन स्पॅम' कमी झाल्याने तीन मिनिटांच्यावर अनेक जण काय वाचतात किंवा काय पाहतात, हा संशोधनाचा विषय आहे. करोनानंतर प्रेक्षकांना थिएटरमध्ये खेचून आणण्याचे आव्हान अजून संपलेले नाही. घरात मोठा टीव्ही आणि त्याला 'डॉल्बी ॲटमॉस'ची जोड देऊन घरातच थिएटरचा फिल किंवा मोबाइल, टॅबलेट, लॅपटॉपवर ओटीटी पाहण्याची सवय जडल्याने खास चित्रपट पाहण्यासाठी थिएटरमध्ये जाण्याचे प्रेक्षकांचे प्रमाण कमी झाले आहे. हिंसा आणि अंगावर येणारा आशय असलेल्या बेवसीरिज पाहण्याचे व्यसन ही मनोरंजनाची नवी व्याख्या आहे. याचा फटका सर्व भाषेतील चित्रपट निर्मितीला बसला, तरी भव्य चित्रपटांच्या निर्मितीमुळे हिंदी, इंग्रजी आणि दाक्षिणात्त्य चित्रपट गल्ला भरतात. मराठी चित्रपटांना ती सोय नाही. यामुळे 'श्वास' आणि 'सैराट' या दोन वेगळ्या दशकातील चित्रपटांच्या निर्मितीनंतर मराठी चित्रपटांसाठी निर्माण झालेले आशादायी वातावरण आता नाही. मराठी चित्रपटांना मल्टिप्लेक्समध्ये स्थान नव्हते आणि नाही; तसेच 'ओटीटी'वरही मराठी चित्रपट प्रदर्शित होण्याचे प्रमाण जवळपास शून्य आहे. नेटफ्लिक्स, प्राइम, हॉटस्टार, झी फाइव्ह, सोनी लिव्ह या महत्त्वाच्या 'ओटीटी'वर मराठी चित्रपट प्रदर्शित होत नाही. या माध्यमांवर उपलब्ध असलेले मराठी चित्रपट जुने आहेत. मराठीसाठी स्वतंत्र 'ओटीटी' तयार करण्याचा प्रयत्न झाल्यानंतर काही व्यासपीठे तयारही झाली; मात्र, वरील मोठ्या कंपन्यांपुढे त्यांचा निभाव लागलेला दिसत नाही. या सगळ्या अर्थकारणाचा मोठा फटका मराठी चित्रपटांना बसला आहे. हक्काची जागा नसल्याने दर्जेदार मराठी चित्रपट तयार होताना दिसत नाही. यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न पुण्यातील काही मंडळींनी केला आहे. पुण्यातील 'द बॉक्स' या प्रायोगिक नाट्यगृहात 'या गोष्टीला नावच नाही' या चित्रपटाचे नोव्हेंबरमध्ये चार दिवस रोज दोन खेळ आयोजित करण्यात आले होते. आर्थिकदृष्ट्या छोटा जीव असलेल्या मराठी चित्रपटाला, कलात्मक चित्रपटाला चित्रपटगृह मिळणे, तो चित्रपटगृहात टिकून राहणे आव्हानात्मक असते. कारण पहिल्या दोन दिवसांच्या प्रतिसादावर चित्रपटगृहचालक चित्रपट चित्रपटगृहात ठेवायचा की नाही हे ठरवतात. काही वेळा चित्रपटाला ॲडव्हान्स बुकिंग नसल्यास आयत्या वेळी खेळ रद्द होतात. अशा परिस्थितीत चित्रपट प्रदर्शनासाठी पर्यायी व्यवस्थेचा विचार करणे गरजेचे आहे. रंगकर्मी प्रदीप वैद्य यांनी त्यांच्या 'द बॉक्स' या प्रायोगिक नाट्यगृह संकुलातील 'बॉक्स टू' या नाट्यगृहात चित्रपट दाखवण्याची तयारी दर्शवली आणि चित्रपटाचा फलक झळकला. 'या गोष्टीला नावच नाही' या चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक संदीप सावंत यांनी या पूर्वी 'श्वास', 'नदी वाहते' हे चित्रपट राज्यभरात ठिकठिकाणी जाऊन दाखवले होते. 'नाट्यगृहात मोकळ्या वेळेत चित्रपट दाखवणे शक्य

आहे. त्यामुळे 'बॉक्स टू' मध्ये चित्रपटांसाठी काही करण्याचा विचार होता. 'या गोष्टीला नावच नाही' या चित्रपटापासून त्याची सुरुवात करण्याबाबत संदीप सावंत यांना विचारणा केली. सावंत तसेच निर्मात्यांनी, वितरकांनीही अनुकूलता दर्शवली. या चित्रपटाचे चार दिवस खेळ दाखविण्यात आले. नाट्यगृहात चित्रपट दाखवल्यामुळे चित्रपटाला हक्काची जागा, हक्काची वेळ मिळू शकेल, हे आत्ताच सांगता येणार नाही. मात्र, सकस आणि आशयघन कलाकृती प्रेक्षकांपर्यंत पोहोचावी, हा आमचा उद्देश आहे. या प्रयोगातून भविष्यात मराठी चित्रपटांसाठी नवी वाट निर्माण झाली तर ते नाटकासाठी पूरक असेल. आपल्याकडे तिकिट काढून लघुपट किंवा माहितीपट पाहण्याची सवय नाही. चित्रपट महोत्सवात किंवा डिजिटल माध्यमांद्वारे लघुपट पाहिले जातात. तिकिट आकारून तीन लघुपट आणि माहितीपट दाखविण्याची योजना आहे,' असे प्रदीप वैद्य सांगतात. 'द बॉक्स'मध्ये आणखी दोन चित्रपट प्रदर्शित झाले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनावर आधारित 'कर्मवीरायण' आणि 'स ला ते स ला ना ते' हा आगामी चित्रपट दाखविण्यात आला. 'कर्मवीरायण' या चित्रपटाचे आठ जानेवारीपर्यंत सायंकाळी पाच आणि रात्री आठ असे दोन खेळ होणार आहेत. 'द बॉक्स'मध्ये प्रोजेक्टर, पडदा आणि चांगली ध्वनिव्यवस्था; तसेच वातानुकूलित व्यवस्था आहे. चांगला प्रतिसाद मिळाला तर थिएटरप्रमाणे सॅटेलाइटद्वारे ऑनलाइन चित्रपट प्रदर्शित करण्याचा विचार करण्यात येणार आहे. 'द बॉक्स'मध्ये चित्रपट दाखविण्याचा प्रयोग नोव्हेंबरमध्ये झाला, तरी त्याची बरीच चर्चा आधीपासून सुरू होती. राष्ट्रवादी काँग्रेसच्या चित्रपट व सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांनी तत्कालीन सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेऊन महाराष्ट्रातील सर्व महापालिका तसेच नगरपालिका हद्दीतील नाट्यगृहांमध्ये मराठी चित्रपट दाखविण्यात यावेत, अशी मागणी केली होती. त्यानंतर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत मंत्रालयात बैठकही झाली. पुणे महापालिकेच्या नाट्यगृहांमध्ये हा प्रयोग कसा यशस्वी करता येईल, यासाठी महापालिकेच्या सांस्कृतिक विभागाचे उपायुक्त सुनील बल्लाळ आणि कलाकारांच्या संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. कुठल्या नाट्यगृहांमध्ये सिनेमे दाखवता येऊ शकतात, तांत्रिक अडचणी, पडदा, ध्वनी व्यवस्था अशा बाबींवर चर्चा होऊन २० डिसेंबर रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहामध्ये 'हॅशटॅग तदैव लग्नम्' हा चित्रपट दाखविण्यात आला. पुणे महापालिकेच्या पुढाकाराने मराठी चित्रपटांच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या चित्रपटाचा पहिला खेळ (प्रीमियर) नाट्यगृहात दाखविण्यात आला. पडद्यावर यशवंतराव चव्हाण नाट्यगृह आणि चित्रपटाच्या खेळाची तारीख असा वॉटरमार्क लावण्यात आला होता; जेणेकरून कोणी चित्रीकरण केल्यास समजू शकेल. अशा प्रकारे नाट्यगृहात चित्रपट दाखविण्यात तांत्रिक अडचणी नाहीत. राज्यासह देशभरात कुठेही अशा प्रकारे चित्रपट दाखविला जाऊ शकतो. 'नाट्यगृहांमध्ये रोज नाटकाचे प्रयोग नसतात. मल्टिप्लेक्सच्या तुलनेत तिकिटदर कमी असल्याने प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळेल. राज्य सरकारने याबाबत सर्व महापालिका आणि नगरपालिका प्रशासनाला हा उपक्रम सुरू करण्यासाठी आदेश द्यावा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. प्रभागात भव्य विकासकामे करण्याचे प्रतीक म्हणून नाट्यगृहांच्या उभारणीकडे लोकप्रतिनिधींचा कल असतो; पण ही वास्तू सांस्कृतिक केंद्र होईल का, नाटकाचे प्रयोग होतील का, याचा कसलाही विचार या मंडळींनी केलेला नसतो. शहरातील अनेक नाट्यगृहे आज अशी नाटकांसाठी निरूपयोगी ठरून पांढरा हत्ती झाली आहेत. या वास्तू चित्रपटांच्या प्रदर्शनासाठी उपयोगात आणता येतील. मुंबई-पुण्याबाहेर उर्वरित महाराष्ट्रात थिएटरची अवस्था फार काही चांगली नाही. तिथेही असलेली नाट्यगृहे अशी उपयोगात आणता येईल. मात्र, चित्रपटांचे अर्थकारण सुधारण्यासाठी नाट्यचळवळीचा बळी जाऊ नये.

भारतीय शेअर बाजारात मोठा भूकंप!

चीनी व्हायरसने शेअर बाजाराचे १२ वाजवले, गुंतवणुकदारांचे ११ लाख कोटी पाण्यात

मुंबई, (वृत्तसेवा):-भारतीय शेअर बाजारात आज मोठा भूकंप झाला. करोना सारखा व्हायरसचे देशात रुग्ण आढळल्याने आठवड्याच्या सुरुवातीला तेजीत सुरू झालेला बाजार काही तासानंतर जोरदार खाली आला. अशात तिमाही निकालाबाबत असलेल्या शंकेची आणि जागतिक बाजारपेठेतील बंदीची भर पडली. ज्यामुळे मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक १ हजार २५८ अंकांनी घसरून बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक २३ हजार ६१६वर आला. निफ्टीमध्ये ३८८.७० अंकांची घसरण झाली. शेअर बाजारात आज दिवसभरात झालेल्या घसरणीमुळे गुंतवणुकदारांचे १०.८३ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले. बीएससी मिडकॅप इंडेक्स २.४४ टक्के, स्मॉलकॅप इंडेक्स

३.१७ टक्के घसरणीसह बंद झाला. इतक नाही तर बीएससी सेक्टोरल इंडेक्स देखील मोठी घसरण झाली. युटिलिटी, मेटल, रियल्टी, पॉवर आणि ऑइल तसेच गॅस या क्षेत्रातील कंपन्यांच्या शेअर्सना सर्वाधिक फटका बसला. बाजार बंद झाला तेव्हा सेन्सेक्स १ हजार २५८.१२ म्हणजे १.५९ टक्क्यांनी घसरून ७७ हजार ९६४.९९ अंकांवर बंद झाला. तर निफ्टी ३८८.७० अंकांनी म्हणजे १.६२ टक्क्यांच्या घसरणीसह २३ हजार ६१६.०५ अंकांवर बंद झाला. मुंबई शेअर बाजारात नोंदणीकृत कंपन्यांचे एकूण मार्केट कॅप घसरले आणि ते ४३९.०३ लाख कोटींवर पोहोचले. शुक्रवारी हेच मार्केट कॅप ४४९.७८ लाख कोटी इतके होते. बाजारातील गुंतवणुकदारांच्या संपत्तीत १०.८३ लाख कोटी रुपयांची घसरण झाली. सेन्सेक्समधील ३० पैकी फक्त ३ शेअर तेजीतहोते. ज्यात टायटन, एससीएल टेक आणि सन फार्मा यांचा समावेश होता. तर बाजारातील ४ हजार २४४ पैकी ६५७ शेअर तेजीसह बंद झाले आणइ ३ हजार ४७१ शेअर घसरणीसह बंद झाले.

अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या

राष्ट्रीय अध्यक्षपदी राजकिशोर मोदी यांची निवड

अंबाजोगाई, (प्रतिनिधी):- अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदी प्रदेश अध्यक्ष राजकिशोर मोदी यांची सर्वानुमते बिनविरोध पणे निवड करण्यात आली आहे. मागील महिन्यात ओंकारेश्वर येथे अखिल भारतीय सर्ववर्गीय जायसवाल महासभेची बैठक संपन्न झाली होती . या बैठकीत महाराष्ट्रासह देशभरातून जायसवाल बांधव सहभागी झाले होते. या बैठकीत मावळते राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची निवड समिती गठीत करून यातून सर्वांनी विचार विनिमय व चर्चा करून एकमताने राजकिशोर मोदी यांची आगामी २०२५ ते २०२८ या काळासाठी जायसवाल महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाल्याचे अशोक जायसवाल यांच्या वतीने जाहीर करण्यात आले. अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी हे सध्या अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष पदाचा कार्यभार सांभाळला आहे. महाराष्ट्र प्रदेश जायसवाल संघटनेच्या अध्यक्ष पदाची जवाबदारीही राजकिशोर मोदी हे लिलया सांभाळत आहेत. त्यांनी प्रदेशअध्यक्ष पदाच्या कालखंडात समाजासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्य केले आहे. अंबाजोगाई शहरात आगामी काळात अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेचे राष्ट्रीय महाअधिवेशन संपन्न होणार असून

यामध्ये मावळते राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल यांच्याकडून राजकिशोर मोदी यांचा पदग्रहण व शपथ ग्रहण सोहळा देखील संपन्न होऊन ते २०२५ ते २०२८ पदासाठी महासभेच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेऊन महासभेच्या कार्यभार सांभाळनार आहेत. राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या कार्यकाळात समाजातील तरुण तरुणींना उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देऊन त्यांना प्रेरित करण्यात येणार असल्याचे याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी सांगितले. त्याचबरोबर समाजातील सर्व वर्गीय घटकांना सामाजिक मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. राजकिशोर मोदी यांची राष्ट्रीय अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल त्याचे समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन होऊन त्यांना पुढील काळासाठी शुभेच्छा प्राप्त होत आहेत.

पान १ वरून

दादांचा धनंजय...

असताना आणि त्यांचा राजीनामा मागितला जात असताना अजित पवार यांचे मौनव्रत अनेकांना आश्चर्यचकित करणारे होते. मात्र अजित पवार परदेशात असल्याने त्यांनी याप्रकरणावर कोणतेही भाष्य केले नाही. दरम्यान अजित पवार दोन दिवसांपूर्वी परदेशातून आल्यानंतर बारामतीहून ते प्रथमच मुंबईत आले. त्यानंतर धनंजय मुंडे यांनी त्यांची भेट घेतली. दोघांमध्ये जवळपास एक तास खंडणी आणि हत्या प्रकरणातील आरोपांवर चर्चा झाल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले. ✻ अजितदादांच्या भेटीनंतर धनंजय मुंडे यांनी माध्यमांना काय सांगितले? : आपण दादांची भेट घेण्याकरिता गेला होतात, राजीनाम्यावर काही चर्चा झाली का? असे धनंजय मुंडे यांना विचारले असता, दादांना नववर्षाच्या शुभेच्छा देण्यासाठी गेलो होतो. आमच्या दोघांत राजीनाम्यावर शब्दानेही चर्चा झाली नाही, असे सांगत राजीनाम्याच्या चर्चांचे खंडन धनंजय मुंडे यांनी केले

जोपर्यंत दोषी...

आहेत म्हणून धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणे हे योग्य होणार नाही, अशी अजित पवार यांची भूमिका असल्याचे कळते. याचाच अर्थ एसआयटी आणि न्यायालयीन चौकशीपर्यंत धनंजय मुंडे यांच्यावर कारवाई होणार नाही. विविध पक्षाच्या आमदारांनी बीडच्या प्रकरणावर एसआयटी चौकशी झाली पाहिजे, अशा मागणी केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी चौकशी समिती नेमली आहे. तपास चालू आहे, तपास होऊ द्या. तपासानंतर ज्या गोष्टी समोर येतील, त्यानंतर ठरवू, असे धनंजय मुंडे यांनी सांगितले.

योजना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी...

करणार्या यंत्रणांनी समिती गठीत करावी. तहसिलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी यांनी गावागावांमध्ये जाऊन कॅम्प घ्यावेत. या कॅम्पमध्ये संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी त्यांच्या विभागांच्या योजनांबाबत लाभार्थ्यांना मार्गदर्शन करावे, तसेच त्यांना येणार्या अडीअडचणी सोडविण्यासाठी संबंधित अधिकारी, कर्मचारी यांना सूचित करावे. असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड आणि शिरूर कासारचे तहसिलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी यांना दिले आहेत. याबाबत आ.क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

सरपंच हत्या प्रकरण...

मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. यासाठी आज मुंबई येथे शिष्टमंडळाने राज्यपाल सी.पी. राधाकृष्ण यांची राजभवनात भेट घेऊन निष्पक्षपणे चौकशी व्हावी यासाठी मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा यासह विविध माण्यांचे निवेदन दिले आहे. यावेळी छत्रपती संभाजीराजे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खासदार बजरंग सोनवणे, आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार सुरेश धस, आमदार विजय वडेट्टीवार, आमदार संदीप क्षीरसागर, ज्योतीताई विनायक मेटे, धनंजय जाधव, अंकुश कदम यांची उपस्थिती होती. स्व. संतोष देशमुख यांना न्याय मिळाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. असे ही यावेळी आ. संदीप क्षीरसागर यांनी स्पष्ट केले.

गुंडापासून लोकप्रतिनिधींच्या...

पोलीस संरक्षण पुरावावं, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. मागील महिन्यात बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे काही गुंडानी अपहरण करून निघृण हत्या केली. सदर अमानवीय घटनेचे पडसाद केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात उमटले. गुन्ह्यातील फरार आरोपींना आणि त्यामागील सुत्रधारांना तात्काळ अटक करावी म्हणून महाराष्ट्राभरात आंदोलने उभी राहिली आहेत. यासंदर्भात बीड जिल्ह्यात निघालेला पहिला आक्रोशमोर्चा राज्यशासनापर्यंत या घटनेचे गांभीर्य पोहोचवणारा होता. त्यात जात, धर्म आणि पक्ष हे भेद बाजूला सारून क्रौर्याची परिसीमा गाठणाऱ्या घटनेचा निषेध झाला. फरार आरोपींना व त्यामागील सुत्रधारांना तात्काळ अटक होऊन कडक शासन व्हावे अशी एकमुखाने मागणी करण्यात आली. सदर आक्रोश मोर्चाच्या सांगता प्रसंगी आमदार सर्वश्री संदीप क्षीरसागर, प्रकाश सोळंके, जितेंद्र आव्हाड, अभिमन्यू पवार आणि सुरेश धस तसेच बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी आपल्या भाषणांतून आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या. घटनेत सहभागी असणारे गुंड, घटनेचे सुत्रधार व घटनेस जबाबदार असणाऱ्या व्यक्तीचा नामोल्लेख केला. महाराष्ट्राच्या सुसंस्कृत परंपरेला लांछन लावणाऱ्या ह्या घटनेचा तातडीने तपास व्हावा याकरीता प्रसारमाध्यमे देखील महत्त्वाची भूमिका बजावीत आहेत, असं शरद पवार म्हणाले. सदर घटनेविरुद्ध आवाज उठवणाऱ्या लोकप्रतिनिधी व इतर नेत्यांच्या जिवितास आणि आरोग्यास कोणताही धोका उत्पन्न होऊ नये म्हणून वेळीच खबरदारी घ्यावी, तसेच त्यांच्या सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेऊन योग्य ते पोलीस संरक्षण राज्यशासनामार्फत पुरवण्यात यावे, अशी मागणी त्यांनी यावेळी केली आहे.

खा.बजरंग सोनवणेंनी...

सक्सेना यांना दिलेल्या निवेदनात बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था प्रभावित करणाऱ्या गंभीर मुद्यांवर आभ्यासपूर्ण निरीक्षणे निदर्शनास आणून दिली. यात पोलीस ठाण्याच्या स्तरावर राजकीय हस्तक्षेप खूपच जास्त आहे, ज्यामुळे प्रभावी आणि निष्पक्ष पोलीसिंगला अडचणीत येतात. गावगुंड, जे अनेकदा प्रभावशाली राजकीय नेत्यांच्या पाठिंब्यावर कार्यरत असतात, त्यांनी पोलीस ठाण्यांशी संगनमत करून जमीन बळकावणे, वाळू उत्खनन, बेकायदेशीर दारू उत्पादन, आणि जुगार अड्डे अशा बेकायदेशीर क्रियांना चालना दिली आहे. गोदावरी नदी पट्ट्यात, विशेषत: गेवराई, माजलगाव, आणि परळी तालुक्यांमध्ये वाळू माफिया सक्रिय आहे. ज्याचा काळा पैशामध्ये वार्षिक उलाढाल कोट्यावधींची आहे. वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या अनेक मोठ्या गाड्या राजकीय नेत्यांच्या निकटवर्तीयांच्या नावे नोंदणीकृत आहेत. वाळू माफियांकडे मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, बेकायदेशीर शस्त्रे, बनावट नंबर प्लेट असलेल्या वाहने, आणि महसूल विभागाशी मजबूत संबंध आहेत. वाळू माफियांकडून वापरली जाणारी काही वाहने पोलीस कर्मचाऱ्यांच्या वित्तपुरवठ्यावर चालतात, अशी माहिती मिळते. कांही सरकारी अधिकारी, विशेषत: पोलीस व महसूल विभागाचे, वाळू माफियांशी संबंधित असून, त्यांना धाडीबाबत आगाऊ माहिती पुरवतात, ज्यामुळे कायद्याची अंमलबजावणी कमकुवत होते. अनेक पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी त्यांच्या नियुक्त्या राजकीय नेत्यांच्या शिफारसीवरून मिळवतात, ज्यामुळे अंमलबजावणीत पक्षपातीपणा होतो आणि पारदर्शकतेचा अभाव दिसतो. बीड जिल्ह्यातील बेकायदेशीर कृतींमुळे दरवर्षी हजारो कोटी रुपयांचा काळा पैसा निर्माण होतो, ज्यामुळे भ्रष्टाचार अधिक वाढतो आणि प्रशासन कमकुवत होते. वरील सर्व प्रकार गेल्या कांही वर्षात कांही विशिष्ट लोकांच्या कृतिमुळे जिल्ह्याची प्रतिमा डागाळली जात आहे. उद्योजक जिल्ह्यामधे नवीन उद्योग उभारण्यास तयार होत नाहीत. परिणामी बेरोजगारी वाढत आहे व त्यातून तरुणांचा कल बेकायदेशीर कृत्याकडे वाढत आहे. जिल्ह्यातील कांही राजकीय नेते, कायदा अंमलबजावणी यंत्रणा आणि बेकायदेशीर कृत्य करणारे यांच्यातील साखळीवर कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे, असेही निवेदनात म्हटले आहे.

धनंजय मुंडे आणि वाल्मिक...

आम्ही प्रामाणिक काम केलं. पण लोकसभेचा पराभव आमच्यामुळे झाला असं सांगत जबाबदार ठरवण्यात आलं. त्यामुळेच विधानसभेला आमच्याविरोधात पंकजा मुंडे यांनी उमेदवार दिला असल्याचं सुरेश धस म्हणाले. ✻ मला संरक्षणाची गरज नाही : बीड प्रकरण हे गंभीर असून त्याविरोधात आवाज उठवणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या जीवाला धोका आहे. त्यामुळे त्यांना संरक्षण देण्यात यावं अशी मागणी शरद पवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. त्यावर प्रतिक्रिया देताना सुरेश धस म्हणाले की, मी कुणालाही घाबरत नाही. मला कुठल्याही संरक्षणाची गरज नाही. पण जे लोकप्रतिनिधी या विरोधात आवाज उठवतात त्यांच्या कुटुंबीयांना संरक्षण दिली जावी. ✻ वाल्मिक कराडमुळे बजरंग सोनवणे मुंडेंपासून दूर : वाल्मिक कराडने धनंजय मुंडेंना एकही मित्र ठेवला नाही असा आरोप आमदार सुरेश धस यांनी केला. ते म्हणाले की, ''वाल्मिक कराड आणि विष्णू चाटेमुळे बजरंग सोनावणे हे धनंजय मुंडेंपासून बाजूला गेले. एकवेळ बजरंग सोनावणे हे धनंजय मुंडे यांच्या अत्यंत जवळचे मित्र होते. पण वाल्मिक कराड आणि विष्णू चाटेमुळे ते मुंडेंपासून दूर गेले. विष्णू चाटेला तालुका अध्यक्ष करायची गरज काय होती? बजरंग सोनवणेसारखा तगडा उमेदवार समोर असल्यानेच पंकजा यांचा पराभव झाला. ते बाजूला गेले नसते तर पंकजा मुंडे कधीच पडल्या नसत्या.''

धनंजय मुंडेसाठी...

द्यावीत असे म्हटले आहे. अविनाश नाईकवाडे यांनी पत्रकार परिषदेतून काही लोकप्रतिनिधी जिल्ह्याची बदनामी करित असल्याचे सांगितले. आम्ही इतके दिवस शांत होतो, पण आता किती सहन करणार? मंत्री धनंजय मुंडेंचे नेतृत्व संपवु पाहणारे आ. सुरेश धस कोण आहेत? बुझ्या गायकवाड हत्या प्रकरणातील आरोपी संजय तांबडे वापरत असलेला मोबाईल क्रमांक गायकवाड हत्या प्रकरणाच्या काही दिवस अगोदर सुरेश धस वापरत होते. आबासाहेब विक्रम धस (आरोपी ११) याच्याकडून ३ लाख जप्त करण्यात आले होते, त्या आरोपीचे आणि धसांचे संभाषण झाले होते, या संबंधावर आ. सुरेश धस काय बोलणार आहेत असे नाईकवाडे म्हणाले. आ. धस गुंडगिरीवर बोलतात पण पुण्यातील गुंड निलेश घायवाळ सोबत सुरेश धस काय करित आहेत? खंडणी प्रकरणात सुरेश धसांनी ज्याचा उल्लेख केला तो नितीन विक्कड हा सुरेश धसांचा माणूस आहे, याचही सुरेश धसांनी उत्तर द्यावं असे नाईकवाडे म्हणाले. जरांगेंनाही केली विनंती पत्रकार परिषदेतून अविनाश नाईकवाडे यांनी मनोज जरांगे यांनाही विनंती केली. मनोज जरांगे आमच्यासाठी दैवत, आजपर्यंत स्टेजवर एकटे बोलायचे, आज काय वेळ आली? तुमचे व्हिडिओ दाखविणारा मी आहे. तुमच्यासाठी फुलं वेचणारा मी आहे. पण तुमच्या तोंडातून हिंसेची भाषा योग्य नाही. मराठा समाजाला हिंसेकडे नेऊ नका असे नाईकवाडे म्हणाले.

मातोश्री ग्राम समृध्दी...

म्हणजेच २३ टक्केच कामे पूर्ण झाली असुन ग्रामीण भागात ही योजना मृगजळ झाली असुन ग्रामस्थांना स्वखर्चाने रस्ते करण्याची वेळ आली असुन जिल्हा प्रशासनाने तातडीने प्रलंबित शेत/ पाणंद रस्त्यांची कामे सुरू करून पावसाळ्यापूर्वी पुर्ण करण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , रामधन जमाले बीड जिल्हाध्यक्ष (इंटक), सखाराम बेंगडे, बीड जिल्हासचिव (इंटक),शेख युनुस,सुदाम तांदळे, शेख मुबीन, शिवशर्मा शेलार यांनी अविनाश पाठक जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत रोहयो मंत्री भरत गोगावले यांना केली आहे. ✻पावसाळ्यापूर्वी शेत/पाणंद रस्ते पुर्ण करण्याच्या शासन परिपत्रकात सुचना : शेत/ पाणंद रस्त्यांची कामे पावसाळ्यात करणे अडचणीचे असते.सदर कामांना खरीप हंगामानंतर सुरूवात केल्यास कामे विना खंड पुर्ण होऊ शकतात ही बाब विचारात घेऊन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीच्या काळात म्हणजेच उन्हाळ्याच्या कालावधीत पूर्ण करून घेणे आवश्यक आहे. आर्थिक वर्षामध्ये प्रारंभी पासुनच शेत/ पाणंद रस्त्यांच्या कामांना सुरुवात होणे आवश्यक असल्याचे मातोश्री ग्राम समृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत शासन परिपत्रकात म्हटले आहे. ✻ मोबाईल मानिटरींग अँप आदी किचकट नियमांमुळे रस्त्यांची कामे प्रलंबित - डॉ.गणेश ढवळे : शेतवस्त्या आणि पाणंद रस्त्यांच्या कामांची बीड जिल्ह्यात मोठी समस्या निर्माण झाली आहे.मोबाईल मानिटरींग अँप मुळे मजुरांची हजेरी घेणे अवघड झाले आहे.सदरील हजेरीसाठी सार्वजनिक कामासाठी दिवसातून दोन वेळा मजुरांचे फोटो काढावे लागत असल्याने व कामावर मजूर दाखवणे अवघड झालेले आहे. त्यामुळे रस्त्यांची कामे रखडलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे किचकट प्रक्रियेमध्ये सुलभता आणण्याची आवश्यकता असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबीर म्हणजे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविणारे व्यासपीठ : दत्ताभाऊ बारगजे

पाथर्डी । प्रतिनिधी

राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे सशक्त साधन मानले गेले असून राष्ट्रीय एकात्मता म्हणजे विविध सामाजिक गटांना एका राष्ट्रीय घटकात आणि प्रवाहात सामील करून घेण्याची प्रक्रिया होय. शिक्षित जनशक्तीच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करून उत्तम राष्ट्रभक्त नागरिक घडवण्याची प्रक्रिया म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यम ातून होत असते. म्हणूनच राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबीर म्हणजे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविणारे व्यासपीठ होय. असे प्रतिपादन इन्फट इंडिया आनंदग्राम चे अध्यक्ष दत्ताभाऊ बारगजे यांनी

केले. पाथर्डी येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने श्री क्षेत्र मोहटादेवी येथे आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बबन चौरे तर व्यासपीठावर संध्याताई बारगजे, डॉ अशोक कानडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. अरुण राख, प्रा. आनंद घोंगडे, डॉ. वैशाली आहेर, ग्रंथपाल डॉ किरण गुलदगड, डॉ. अजयकुमार पालवे, डॉ विजय देशमुख, डॉ अशोक डोळस, डॉ भगवान सांगळे आदी उपस्थित होते.

बारगजे पुढे म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना या संकल्पनेतील सेवा व त्याग हे दोन शब्द विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वासाठी खूप महत्वाचे असतात. विशेषतः शिक्षण क्षेत्रातून सेवा संस्कार तरुणांवर व्हावा, तरुणांकडून राष्ट्रसेवा घडावी. युवा शक्तीचा उपयोग राष्ट्राला व्हावा या हेतूने महाविद्यालयीन स्तरावर ज्या विविध योजना राबविल्या जातात त्यामध्ये सर्वात वरचा क्रमांक राष्ट्रीय सेवा योजनेचा लागतो. राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे चौकटीच्या बाहेरील शिक्षण होय. शिक्षण घेताना ज्ञानाचा आणि कर्तृत्वाची सांगड बसली पाहिजे कारण जगातील अनेक कर्तृत्वान लोक खूप कमी शिकलेले आहेत. एनएसएस हे ज्ञान, धर्म व पंथाच्या बाहेर जाऊन जगण्याची उमेद देते. शिक्षणामुळे माणसाला सहज जगता आले पाहिजे. दुर्दैवाने आजच्या शिक्षणातून माणुसकीचा फारसा मेळ बसत नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अरुण राख, सुत्रसंचालन डॉ वैशाली आहेर तर आभार प्रा. आनंद घोंगडे यांनी मानले.

प्रा. रोहीत शिंदे यांना पि एच डी प्रदान

किल्लेधारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूरचे सुपुत्र प्रा. रोहित शंकर शिंदे यांना क्रातीज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पी एच डी पदवी प्रदान करण्यात आली. क्रातीज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठात प्रा रोहीत शंकर शिंदे यानी पी एच डी संशोधनाचा विषय डोप केलेल्या आणि डोप न केलेल्या नॅनोस्ट्रक्चर्सचे डिझाइन, संश्लेषण आणि वैशिष्ट्यीकरण, तसेच त्यांचा डाई डिग्रेडेशन, सेंद्रिय संश्लेषण आणि अँटीम ायक्रोबियल अभ्यासांमध्ये उपयोग.डॉ. रोहित शिंदे यांचे

१२ संशोधन लेख आंतरराष्ट्रीय पातळीवर चांगल्या इम्पॅक्ट फॅक्टर असलेल्या संशोधन जर्नलमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या संशोधन कार्याचा जागतिक पातळीवर २१३ संशोधकांनी उल्लेख त्यांच्या संशोधनामध्ये केला आहे.ते आपल्या किल्ले धारूरचे सुपुत्र असून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे माजी कार्यकारी संचालक शंकर दशरथ शिंदे यांचे चिरंजीव आहेत. पी एच डी साठी त्यांचे मार्गदर्शक लोकनेते व्यंकटराव हिरे कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे संशोधन मार्गदर्शक प्रो. डॉ. टी. बी. पवार होते. त्याचबरोबर प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे, प्रो. डॉ. बी. एस. देसले, डॉ. विष्णू अडोळे (रिसर्च मेंटोर) आणि डॉ. राहुल शिंदे (रिसर्च मेंटोर) यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याना पी एच डी पमिळाल्याने सर्वत्र कौतूक होत आहे.

'दिलखुलास' कार्यक्रमात पोलीस अधीक्षक रूपाली अंबुरे यांची मुलाखत

मुंबई । प्रतिनिधी

रस्त्यांवरील अपघात आणि त्यामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी दरवर्षी जानेवारी महिन्यात 'रस्ता सुरक्षा' मोहीम राबविण्यात येते. यासाठी परिवहन व महामार्ग सुरक्षा विभागामार्फत विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येतात. नागरिकांनी रस्तासुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करून आपले व इतरांचे आयुष्य सुरक्षित ठेवावे, असे आवाहन महामार्ग सुरक्षा विभागाच्या पोलीस अधीक्षक रूपाली अंबुरे यांनी 'दिलखुलास' कार्यक्रमातून केले आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मिती 'दिलखुलास' कार्यक्रमात पोलीस अधीक्षक श्रीमती अंबुरे यांची मुलाखत मंगळवार दि. ७, बुधवार दि. ८, गुरूवार दि. ९ आणि शुक्रवार दि. १० जानेवारी २०२५ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व 'न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल ॲपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. निवेदिका सुषमा जाधव यांनी ही मुलाखत घेतली आहे.

निर्भीड पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर

बीड । प्रतिनिधी

निर्भीड पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य बीड जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठकीचे शासकीय विश्रामगृह बीड येथे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सर्वांनुमते जिल्हा व माजलगाव येथील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षपदी जिल्हाध्यक्ष देवेंद्र ढाका तर जिल्हासचिव आनंद वीर मार्गदर्शक समीर काझी व महिला जिल्हाध्यक्ष किरण डोळस यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये जिल्हा कार्याध्यक्षपदी परमेश्वर सोळंके व जिल्हा उपाध्यक्षपदी

अमर साळवे यांची निवड करण्यात आली. तसेच माजलगाव तालुका अध्यक्षपदी बाळासाहेब आडागळे उपाध्यक्षपदी शेख हमीद, सचिव राजरत्न डोंगरे सहसचिव सिद्धेश्वर गायकवाड, माजलगाव तालुका कार्याध्यक्षपदी संतोष रासवे तर मार्गदर्शक म्हणून प्रचंड सोळंके यांची निवड करण्यात आली. संघटक पदाची जबाबदारी विजय कापसे तर सहसंघटक पदी विजय डावरे .

चिंचाळा जि. प.शाळेत सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी

वडवणी । प्रतिनिधी

३ जानेवारी रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचाळा येथे क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली होती. या कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मुंडे सर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून गावातील पालक होते.यावेळी शाळेतील विद्यार्थिनी सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत आल्या होत्या. शाळेतील बहुतांशी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याबद्दल मनोगत व्यक्त केले. तर काही विद्यार्थ्यांनी गीत गायन केले.जागृती पायके या विद्यार्थिनीने सावित्रीची ओवी छान प्रकारे सादर केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डवरे सरांनी केले. गायकवाड मॅडम यांनी सावित्री बाई फुले आणि आजची स्त्री याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रम ासाठी शाळेतील प्रभाळे सर चोले सर, जोशी मॅडम, असलेकर मॅडम, काळे मॅडम उपस्थित होत्या.

आ. विजयसिंह पंडित यांचा जनता दरबार ठरतोय सामान्यांसाठी आधार

सुलतानपूरच्या शाळेला वर्षभरानंतर मिळाला शिक्षक

बीड । प्रतिनिधी

गावच्या जिल्हा परिषद शाळेत भरपूर असलेली विद्यार्थी संख्या. पटसंख्येच्या तुलनेत शिक्षकांच्या रिक्त जागेमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते. यामुळे गत वर्षभरापासून एक शिक्षक मिळावा म्हणून सुलतानपूर येथील ग्रामस्थ प्रशासनाकडे विनंती करत होते. मात्र त्यांच्या पदरी निराशा पडत होती. गत शुक्रवारी आ. विजयसिंह पंडित यांच्या जनता दरबारात हा प्रश्न समोर आल्यानंतर आठ दिवसाच्या आत त्यांनी

सदर शाळेला शिक्षक नियुक्त करून दिला आहे. त्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने आ. विजयसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत.

गेवराई तालुक्यातील सामान्य माणसांच्या कामासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी प्रशासन गतिमान केल्याचे दिसत आहे. प्रशासनावरील मरगळ झटकून टाकण्यासाठी स्वतः जनता दरबार भरवत त्यांनी सामान्य माणसांच्या प्रश्नांना तत्काळ मार्गी लावण्याचा धडाका सुरू केला आहे. केवळ लोकांची गर्दी जमवून दिखावा करण्यापेक्षा प्रत्यक्ष प्रश्न मार्गी लावण्यावर आ. विजयसिंह पंडित यांनी भर दिला आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी काही दिवसांपूर्वी पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन सामान्य माणसांच्या कामाला प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या होत्या. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी सोमवारी भैय्यासाहेब आणि शुक्रवारी स्वतः आ. विजयसिंह पंडित यांनी जनता दरबार भरवत प्रत्यक्ष सुरुवात केली. गत वर्षभरापासून सुलतानपूर येथील ग्रामस्थ जिल्हा परिषद शाळेत एका शिक्षकाची मागणी करत होते. मात्र प्रशासन त्यांच्या मागणीला दाद देत नव्हते. शुक्रवारी आ. विजयसिंह पंडित यांच्या पहिल्या जनता दरबारात सरपंच धनेश्वर खेत्रे व ग्रामस्थांनी सदर अडचण मांडली.

जाहीर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २६४/२०२४

विनोद शिवाजी नलावडे विरुद्ध ग्रा.पं. आहेरचिंचोली

पहा

१. विनोद शिवाजी नलावडे, रा. आहेरचिंचोली ह. मु. लोळदगाव ता.गेवराई जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत भाऊराव बाबाजी नलावडे यांचा दिनांक ०१/०२/१९६० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास आहेर चिंचोली ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे आहेर चिंचोली ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/१२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख १०/०१/२०२५ ही आहे.

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
तहसिलदार
बीड

शिक्का

जाहीरनामा

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय माजलगांव जि.बीड

जा.क्र.२०२४/दंड विभाग/जन्म–मृत्यू नोंद/का.वि. १२७४
दि. २८/११/२०२४

जन्म–मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत
जन्म–मृत्यु नोदणी (सुधारणा) कायदा २०२३
मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, अर्जदार **अर्जुन हरीभाऊ चव्हाण रा. मोगरा (माळतांडा) ता. माजलगांव जि.बीड** यांनी स्वतःच्या मुलाच्या नावे पृथ्वीराज अर्जुन चव्हाण यांचा जन्म दिनांक ०७/०६/२००८ रोजी मोगरा ता. माजलगांव, जि.बीड येथे झाला असुन अर्जदार यांनी सदर जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय मोगरा ता. माजलगांव, बीड यांचे नोंदवहीमध्ये घेऊन प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदार यांची जन्मतारीख व जन्मठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत त्याने या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच आपणांस कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहू अर्जदार यांच्या हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शावीत झाल्यास अर्जदारांचे स्वतः च्या नातलगांच्या जन्माबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्याचे अनुषंगाने विहित कार्यवाही करण्यात येईल.

आज दि. २८/११/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
कार्यकारी दंडाधिकारी तथा
नायब तहसिलदार
तहसिल कार्यालय माजलगांव

शिक्का

प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुल विलेपार्ले यांच्या स्केटिंग खेळाडूंचा राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत दबदबा

मुंबई । प्रतिनिधी

रोलर स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या(RSFI) तामिळनाडू येथील पोलाची शहरात, येथे नुकत्याच झालेल्या ६२ व्या राष्ट्रीय खेळांमध्ये प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाच्या (PTKS) खेळाडूंनी अभूतपूर्व यश मिळवले.

खेळाडूंची कामगिरी पुढील प्रमाणे : वयोगट १४–१७ मुली सोलो– नायशा मेहता – सुवर्ण पदक, वयोगट ११–१४ मुली सोलो – रिदम ममानिया – सुवर्ण पदक, सिया नवले – रौप्य पदक, ९–११ मुली (सोलो) – सिमाया पारेख – रौप्य पदक, वयोगट ७–९

मुली (सोलो)– समायरा नाडकर्णी – सुवर्ण पदक, रिया बांकडा – कांस्य पदक, वयोगट ७–९ फ्री स्केटिंग , समायरा नाडकर्णी – रौप्य पदक, वयोगट ११–१४ इनलाईन मुली, रिदम ममानिया – कांस्य पदक, वयोगट ९–११ कॅरोल ऑफ दी बेल्स, दिविशा बांकडा – कांस्य पदक, सिमाया पारे, नायशा मेहता, आर्या थापर शर्मा, ११–१४ मीस्टिकल ओपेट – सुवर्ण पदक, सिवा नवले, जीयारा जानी , रिदम ममानिया, सीया चुनेकर, वयोगट अंडर १४ – प्रीसीजन, बेला सेनोरीटा – सुवर्ण पदक, सिवा नवले , रिदम ममानिया, मायरा अरोरा, अवनी काटधरे, जियारा जानी, सीया चुनेकर, दिविशा बांकडा , सिमाया पारेख, आराईशा मेहता, वयोगट १४ – १७ , ओम गुजराती – सुवर्ण पदक, २०२४ रोम, ईटली येथे आयोजित जागतिक स्पर्धेत मानांकन क्रमांक –९. , सर्वांना १०० टक्के विश्वास आहे की इतर राज्यातील पदक विजेत्या खेळाडूंमधून २१व्या एशियन स्पर्धे साठी या संकुलाच्या अनेक खेळाडूंची निवड भारतीय संघात होईल असा विश्वास संकुलाचे अध्यक्ष श्री अरविंद रमेश प्रभू यांनी व्यक्त केला.

शंकरराव पाटील तौर प्राथमिक शाळा कुं.पिंपळगाव येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम 'बालिका दिन' म्हणून मोठ्या उत्साहात साजरा

गेवराई । प्रतिनिधी

कुंभार पिंपळगाव प्रतिनिधी दि.३ जानेवारी २०२५ वार शुक्रवार वार रोजी शंकरराव पाटील तौर प्राथमिक शाळा, कुं.पिंपळगाव ता.घनसावंगी जि.जालना येथे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचा कार्यक्रम 'बालिका दिन' म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक प्रदिप चव्हाण हे उपस्थित होते, तर प्रमुख अतिथी म्हणून

शाळेतील शिक्षक विजयकुमार काळे हे उपस्थित होते. यावेळी सर्व प्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली . यावेळी शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच शेवटी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व कार्यक्रमाचे अध्यक्ष यांच्या भाषणाने कार्यक्रमाचा समारोप झाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शाळेतील विद्यार्थी स्वराज पवार व शैलेश साळवे यांनी केले.तर आभार बोटे ओमकार याने मानले.

माजलगाव तालुक्यात घरकुल योजनेचा बट्ट्याबोळ

गटविकास अधिकारी, घरकुल अभियंता, संगणक परिचालकाची चौकशी करून बडतर्फ करण्याची मागणी

माजलगाव/ संतोष रासवे

घरकुल योजना ही शासनाची महत्वकांक्षी योजना असून या योजनेत अधिकारी व कर्मचारी खोडा घालत लाभार्थ्यांना घरकुलापासून वंचित ठेवत आहेत. त्यामुळे पंचायत समिती माजलगाव येथील संबंधित अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून बडतर्फ करणे याबाबत निवेदन देण्यात आले आहे.

याबाबत निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, माजलगाव पंचायत समिती घरकुल विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यावर गटविकास अधिकारी घरकुल सारख्या महत्त्वकांविषयी योजनेत खोडा घालून बदनाम करण्याचे काम अनेक दिवसापासून बिनबोभाट सुरू आहे. लाभार्थ्यांना घरकुल रेखांकन दिल्यानंतर ६/६ महिने घरकुल अभियंता लाभार्थ्याकडे फिरकत नाही. लाभार्थ्यांना जरी भेटी दिल्या तरी त्यांच्याकडून चिरीमिरी घेतल्याशिवाय हप्ते टाकले जात नाहीत. माजलगाव तालुक्यात आज ही हजारो लाभार्थी हक्काच्या घरकुलापासून वंचित राहत आहेत. पात्रुड सर्कल मधील प्रत्येक गावातील लाभार्थी वर्गात प्रचंड असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. ज्या लाभार्थ्यांनी घरकुल अभियंत्यांना लक्ष्मी दर्शन न दिल्यास सध्या बजेट नाही म्हणून वेळ निभावून नेतात. सर्वसाधारणपणे दीड लाखाच्या रकमेत प्रत्यक्षात घरकुल अभियंता, विस्तार अधिकारी, ऑपरेटर यांना पैसे वाटप करून प्रत्यक्षात एक लाख रुपये शिल्लक राहतात. त्यातून घर कसे बांधायचे असा प्रश्न निर्माण झाल्याने घर बांधणीची लाभार्थ्यांची इच्छा राहत नाही लाभ देत असताना अभियंत्याकडून पात्र, गरजू लाभार्थ्यांना वंचित ठेवण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणावर झाला असल्याचे स्पष्ट होते. ऑपरेटर मगरेची झुंडशाही/ हुकूमशाही माजलगाव पंचायत समितीची इज्जत वेशीला टांगणाऱ्या घरकुल ऑपरेटर मगरेची प्रचंड हुकूम शाही वाढली असून लाभार्थ्याकडून पैसे घेतल्याशिवाय कोणाचेच हप्ते काढले जात नाहीत. गेल्या तब्बल १५ वर्षाहून अधिक काळापासून एकाच ठिकाणी ठाण मांडून बसल्याने त्यांची हिंमत बिनदिक्कतपणे वाढली आहे. गटविकास अधिकारी माजलगाव या मगरेच्या काळ्या कारनाम्याला पाठीशी घालत असल्याने त्याची हिंमत वाढत चालली आहे त्यामुळे लाभार्थ्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. माझे कोणीच वाकडे करू शकत नाही कोणी कमी जास्त केले तर खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देतो. तरी या तक्रारीची गंभीर दखल घेऊन संबंधिताची सखोल चौकशी करून त्यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करण्यात यावे नसता आम्ही सर्वजण दि.२३/१/२३ रोजी जिल्हा कार्यालया समोर बेमुदत आमरण उपोषणास बसू असे निवेदन नईम आतार, सोमेश्वर सोनटक्के, पृथ्वीराज निर्मळ, बालाप्रसाद जाजू यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब जि. प. बीड यांना दिले आहे.

फॅशन फ्युजन प्रदर्शन आणि सेल; राज्यस्तरीय ड्रेस डिझाईनिंग स्पर्धा

तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, महाविद्यालयाचा नाविन्यपूर्ण उपक्रम

बीड । प्रतिनिधी

तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, संत ज्ञानेश्वर नगर, बीडच्या वतीने प्रति वर्षी प्रमाणे याही वर्षी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंती निमित्ताने ते राजमाता मासाहेब जिजाऊ यांच्या जयंतीच्या निमित्ताने घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमापैकी दिनांक ८, ९ व १० जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत फॅशन फ्युजन प्रदर्शन आणि सेलचे आयोजन करण्यात आलेले आहे.

प्रदर्शनातील प्रमुख आकर्षण म्हणजे फॅशन ज्वेलरी, डिझायनर सारीज, फॅशनेबल ड्रेसेस, घरगुती सजावटी वस्तू, रंगोली पॅचेस, कुशन्स, डिझाईनर बेबी ड्रेसेस, डिझाईनर गारमेंट्स, पेंटिंग्स, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तूंचे उत्पादन इत्यादी सह विविध डिझाईन पहावयास मिळणार आहेत. प्रदर्शनातील सर्व डिझाईन साहित्य हे महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी केलेल्या कलाकृतीचे असणार आहे व त्यातूनच विद्यार्थिनींना कमवा व शिका योजनेअंतर्गत आर्थिक मदत व्हावी या उद्देशाने प्रदर्शनाच्या वेळी सेलचे आयोजन करण्यात आलेले आहे. दि. ११ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता राज्यस्तरीय ड्रेस डिझायनिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले असून ही स्पर्धा सकाळी ११ ते दुपारी ०४ या वेळेत संपन्न होणार आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थिनींना प्रवेश शुल्क ५०० रुपये असणार आहे तर स्पर्धेचे बक्षीस स्वरूप प्रथम पारितोषिक रोख रक्कम १०००० रुपये स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक रोख रक्कम ७००० रुपये स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक रोख रक्कम ५००० रुपये स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असे आहे.

महाराजा श्रीमंत यशवंतराव होळकर यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त विनम्र अभिवादन कार्यक्रम संपन्न

महापुरुषांचे विचार तरुणांनी वाचले पाहिजेत, प्रा. अण्णासाहेब मतकर

वडवणी । प्रतिनिधी

महाराजा श्रीमंत यशवंतराव होळकर यांनी इंग्रजांना सोळंकेपोळा करून सोडले होते अनेक लढाया इंग्रजांविरुद्ध लढले

त्यातली एक ही लढाई न हरणारा हा योद्धा आहे यशवंतराव होळकर यांनी शिवाजी महाराजा नंतर स्वतःचा राज्याभिषेक करून राजा घोषित करणारा एकमेव राजा आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सांगतात ज्या समाजाचा विचाराचा प्रसार आणि प्रसार होणार नाही त्यांचे विचार

संपले जातील त्यामुळे येणाऱ्या भावी पिढीला आपण महापुरुषांचे संस्कार आणि विचार दिले तर येणारी पिढी ही सुसंस्कृत होईल त्यामुळे प्रत्येकाने पुस्तके वाचून व्याख्यान ऐकून विचार समजून घेऊन पुढील पिढीला देण्याचे काम करावे आपण जीवनामध्ये काहीतरी समाजाचे उपकार आपल्यावर आहेत असे समजून संसार करत असताना समाजाची ही कामे करावीत यांच्या प्रतिमेला राज्याभिषेक दिनानिमित्त विनम्र अभिवादन करताना प्रा, अण्णासाहेब मतकर मा.रासपा जिल्हाध्यक्ष, भगवान माने सर राजे मल्हार राव होळकर प्रतिष्ठान बीड, अंकुशराव येळे सर, वाघमोडे साहेब शिवाजी चांगण युवा नेते, प्रा सापनकर सर मां. रासपा तालुकाध्यक्ष, युवा पत्रकार अंकुश गवळी अभिमान घोंगडे सामाजिक कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

पत्रकारांनी बातम्यांची मांडणी सकारात्मक करावी : जेष्ठ पत्रकार संतोष मुळी

दर्पण दिन साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

स्पर्धेच्या युगामध्ये झटपट बातम्या दिल्याच पाहिजेत परंतु पत्रकारांनी बातम्यांची मांडणी सकारात्मक करण्याबरोबरच माजलगावातील पत्रकार सामाजिक दायित्व निभावत असल्याचे जेष्ठ पत्रकार संतोष मुळी यांनी सांगीतले. येथील शासकीय विश्रामगृहावर दर्पण दिनानिमीत्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमा पुजनाने

कार्यक्रमाची सुरूवात झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी जेष्ठ पत्रकार संतोष मुळी हे तर बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे, अच्युत लाटे, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले, हरिष यादव, उमेश जेथलिया, वैजनाथ घायतिडक, पुरूषोत्तम करवा यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना श्री. मुळी म्हणाले की, या मतदारसंघामध्ये असणारे प्रश्न प्राधान्याने मांडुन पुर्णत्वाकडे नेण्यासाठी येथील पत्रकार कायम प्रयत्नशील असतात तर प्रसंगी विरोधकांची भुमिका देखील पत्रकारच बजावतात.

परीक्षा पे चर्चा' २०२५ साठी नोंदणी सुरू

आष्टी । प्रतिनिधी

परीक्षा पे चर्चा' २०२५ साठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे.६ वी ते १२ वी पर्यंतचे विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांसाठी ही स्पर्धा आहे. सर्व स्पर्धकांना 'परीक्षा पे चर्चा'मध्ये सहभागी होण्याचे प्रमाणपत्रही देण्यात येणार आहे.मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी विद्यार्थी व पालकांशी चर्चा करून विद्यार्थी यांचे ध्येय व स्वप्न पूर्ण करण्याकरीता मनोबल वृद्धिंगत करणार आहेत.व परीक्षाची भिती कमी करण्यासाठी मदत होणार आहे. या स्पर्धेसाठी नोंदणी करण्याची शेवटची तारीख १४ जानेवारी २०२५ आहे.तरी आष्टी तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यी,पालक व शिक्षकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आष्टीचे गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव यांनी केले आहे. या स्पर्धेसाठी नोंदणी करण्याची शेवटची तारीख १४ जानेवारी २०२५ आहे.आष्टी तालुक्यातील ६ वी ते १२ वी पर्यंतचे विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी नोंदणी करुन सहभागी व्हावे असे आवाहन गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव यांनी केले आहे.

छत्रपती साखर कारखाण्याचा ऊस बिलाचा हप्ता रु. २७०० ने बँकेत वर्ग : व्हा.चेअरमन मोहनराव जगताप

माजलगाव । प्रतिनिधी

सावरगाव येथील छत्रपती सहकारी साखर कारखान्याने चालू गाळपातील उसाचा पहिला हफ्ता दोन हजार सातशे रुपयांनी बँकेत वर्ग केला आहे. छत्रपती सहकारी साखर कारखाना सोनाजीनगर सावरगाव ता. माजलगाव जिल्हा बीड या कारखान्याने गळीत हंगाम २०२४-२५ मधील दि. २७/११/२०२४ ते दि. १५/१२/२०२४ पर्यंत एकूण ४४९४१.८६८ मे. टन उसाचे गाळप केले असून त्याचे बिल २७००/- रुपये प्रति टना प्रमाणे एकूण रक्कम १२१३४३०८७/-

रुपये बँकेत वर्ग केले आहेत. तसेच कारखान्याचे कार्यक्षेत्रातील उसाचे गाळप करण्यासाठी कारखाना प्रशासनाने योग्य पद्धतीने नियोजन करून उसाचे गाळप करीत आहे व योग्य वेळी सर्व शेतकऱ्यांचे बिल बँकेत जमा केली आहेत. कारखान्याचे चेअरमन बाजीराव सोनाजीराव जगताप व सर्व संचालक मंडळ यांनी कारखान्याचे गाळप क्षमता कमी असताना सुद्धा शेतकऱ्यांचे हित जपत व कारखान्याकडे कुठलेही उपपदार्थ नसताना सुद्धा योग्य भाव देऊन नियोजन करून गाळप करण्यास कठिबद्ध आहे. तरी भागातील शेतकऱ्यांनी आपला ऊस कारखान्यास देऊन सहकार्य करावे व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपापली बीले आपल्या भागातील संबंधित बँकेस संपर्क साधून बीले जमा करून घ्यावेत अशी विनंती केली आहे.

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज नानिजधाम यांच्या वतीने १५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

बीड । प्रतिनिधी

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज नानिजधाम यांच्या वतीने आज बीड येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, आज सकाळी बीड येथील जिल्हा रुग्णालयामध्ये रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले या शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी बीड जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर संजय राऊत, डॉ शहाणे अन्य, डॉ कट्टे मॅडम, व अन्य डॉक्टरांच्या उपस्थित रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले या उद्घाटनाला असंख्य जनतेने सदर भक्ताची शिष्यांनी सहभाग नोंदवला व उपस्थित होते आज सकाळपासूनच रक्तदात्याची रक्तदान करण्यासाठी गर्दी पहावयास मिळाले संपूर्ण बीड तालुक्यातील रक्तदात्यांनी रक्तदान केले सकाळी दहा वाजल्यापासून संध्याकाळी साडेसहा वाजेपर्यंत हा रक्तदान शिबिराचा कार्यक्रम चालत होता अगदी शेवटपर्यंत रक्तदान करण्यासाठी लोकांची गर्दी होती बीड जिल्हा सेवा समिती व तालुका सेवा समिती यांच्या वतीने हा रक्तदान शिबिराचे आयोजन बीड येथे करण्यात आले होते आज दिनांक ४ रोजी जिल्हा रुग्णालय येथे रक्तदान शिबिर संपन्न झाले असून या शिबिरास रक्तदान करण्यासाठी सदर शिष्य भक्त व इत्तर लोकांनी रक्तदान केले असून आज झालेल्या रक्तदान शिबिरामध्ये सरासरी संपूर्ण १५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले असून हा कार्यक्रम व शिबिर बीड जिल्हा सेवा समिती व तालुका सेवा समिती यांच्या सहकार्याने हे शिबिर उत्स्फूर्त संपन्न झाले. आणखी १९ तारखे पर्यंत ब्लड कॅम्प वेगवेगळ्या तालुक्यात व गावात कॅम्प होणार आहेत तरी सर्व भाविक भक्तांनी व इतरांनी सुधा आपला सहभाग नोंदवावा अशी नम्र विनंती जिल्हा सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

आष्टी नगरपंचायतच्या स्वीकृत नगरसेवकपदी अरुण निकाळजे, बाळासाहेब घोडके यांची बिनविरोध निवड

आ.सुरेश धस यांनी अनुसूचित जातीला न्याय दिल्याने मानले आभार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी नगरपंचायतच्या नाम निर्देशित स्वीकृत सदस्यपदासाठी दोन रिक्त झालेल्या जागेसाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये आ.सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही ही खंदे समर्थक असलेले रिपाई जिल्हा उपाध्यक्ष तथा नेते अरुण निकाळजे व सुधीर (बाळासाहेब) घोडके यांची स्वीकृत नगरसेवकपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. आष्टी नगरपंचायत

येथे विशेष सभेचे आयोजन केले आहे या विशेष सभेचे पिठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी पाटोदा श्रीमती वसिमा शेख यांनी तर बाळ दत्त मोरे प्रभारी मुख्याधिकारी नगरपंचायत आष्टी हे सहाय्यक अधिकारी म्हणून काम पाहिले.

आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस हे सर्व घटकांना सोबत घेऊन जाणारे नेतृत्व असलेले असल्याने आम्हाला संधी दिल्याने आम्ही या संधीचे नक्की सर्वसामान्य दिन दलित वंचित घटकांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू असे नवनिर्वाचित नगरसेवकांनी आपले भावना व्यक्त केली तसेच दोन्ही स्वीकृत नगरसेवक पदावर अनुसूचित जातीला न्याय दिल्याने आमदार सुरेश धस यांचे आभार मानले. नवनिर्वाचित नगरसेवक यांचे दूरध्वनीवरून आमदार सुरेश धस,रिपाई चे नेते पप्पु कागदे, युवा नेते जयदत्त धस,सागर धस यांनी शुभेच्छा दिल्या.

जिल्हा माहिती कार्यालयात मराठी पत्रकार दिन साजरा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित दर्पण दिन अर्थात मराठी पत्रकार दिनाचा कार्यक्रम आज कार्यालयात पत्रकारांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. कार्यक्रमात दर्पण दिनानिमित्त दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने कार्यालयाला श्री बाळशास्त्री जांभेकर यांची एक प्रतिमा भेट देण्यात आली मराठी पत्रकार परिषदेचे राजेंद्र होळकर तसेच विलास डोळसे यांनीही प्रतिमा जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर यांना प्रदान केली.

मराठी पत्रकार परिषदेच्या कार्यक्रमात बडेंचे बडे मुद्दे

वडवणी । प्रतिनिधी

दर्पण दिनाच्या निमित्ताने वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेने आयोजित केलेल्या शाळकरी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करताना अध्यक्षीय भाषणातून भाजप नेते सोमनाथराव बडे यांनी बीड जिल्हा हा गुणवत्तेचा नवा पॅटर्न होऊ शकतो असे सांगत महत्त्वपूर्ण बडे मुद्दे मांडले. याबाबत अधिक वृत्त असे की,वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेत यंदाच्या दर्पण दिनानिमित्त

वडवणी तालुक्यातील पिंपळटक्का येथील जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना दर्पण दिनानिमित्त शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे जेष्ठ नेते सोमनाथराव बडे तर प्रमुख अतिथी म्हणून गटशिक्षणाधिकारी बी.वाय. उजगरे, भाजपचे माजी नगरसेवक आत्माराम जमाले पाटील,डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे,सरपंच संतोष कदम,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राधाकिशन कदम, मुख्याध्यापक बंडु मुंडे, ज्येष्ठ मार्गदर्शक सुधाकर पोटभरे, तालुका अध्यक्ष सतिश सोनवणे, सचिव महेश सदरे, उपाध्यक्ष धम्मपाल डावरे, कोषाध्यक्ष वाजेद पठाण,पत्रकार ओमप्रकाश साबळे, पत्रकार हरी पवार, पत्रकार अतुल जाधव,पत्रकार गीतांजली लव्हाळे,पत्रकार संभाजी लांडे,पत्रकार विजय राऊत, पत्रकार हर्षद उंडाळकर, माजी मुख्याध्यापक शेख सैलानी,पत्रकार ज्ञानेश्वर वाव्हळ, उपाध्यक्ष हनुमंतराव कदम, समितीचे सक्रिय सदस्य इंद्रमोहन कदम यांच्यासह आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.